**23**

# मध्ययुगीन कालखंडातील अधिका-याची कार्य प्रणाली

डॉ. पी. बी. सिरसट
वसंतदादा पाटील कॉलेज पाटोदा, जि. बीड

**प्रस्तावना :**

भारतीय इतिहासात मध्ययुगीन कालखंडाला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. मध्ययुगीन कालखंड सर्वसाधारणपणे इ.स. ११०० ते १८१८ असा मानण्यात येतो. या कालखंडात भारतात व विशेषत: महाराष्ट्रात अनेक सत्तांतरे झाली. प्रत्येक सत्ताधिका-याची आपली सत्ता व्यवस्थित व नियंत्रित पणे चालावी यासाठी काही प्रशासन व्यवस्था हेतू पुरस्सर निर्माण केलेली असते. ती प्रशासन व्यवस्था अधिकार पदे ही या कालखंडात सतत परिवर्तनीय होत आलेली आहेत. अधिकार पदांच्या कार्यप्रणालीत व कार्य करण्याच्या पद्धतीत ही सातत्याने बदल झालेले दिसून येतात.

मध्ययुगीन कालखंडात राजेशाही व सरंजामदारी पद्धत रुढ असल्याने या अधिकार पदांना विशेष महत्त्व प्राप्त झालेले असे. ही पदे कधी वंशपरंपरेने एका पिढीकडून दुस-या पिढीकडे हस्तांतरित होत असत तर काही पदे गुणविशिष्ट व्यक्तीलाच राजे लोक बहाल करीत अथवा त्यांची नेमणूक करीत. यामूळे समाजात अधिकारी व पदावरील व्यक्ती श्रेष्ठ समजल्याजात असत. समाजात अशा अधिकारी वर्गाचा दरारा असे. पदांचा वापर कधी कधी अनियंत्रित पणे केला जात असे. म्हणून अशा अधिकारी वर्ग समाजाच्या रोषालाही क्वचित बळी पडत असे. सर्व साधारणपणे मुलकी प्रशासन व स्थानिक प्रशासन अी वर्गवारी करता येईल. या प्रशसनात खाजगी प्रशासनाचा ही भाग आहे. जनानखाना, भटारखाना, मुदपाक खाना, धार्मिक कार्य करणारी अधिकारी, मानकरी, विश्वस्त, पुजारी इ. चा समावेशयात करता येऊ शकतो.

मध्ययुगाच्या राज्यकर्त्यांच्या अशी भिस्त सर्वस्वी या नोकरदारावर असे. त्यांना त्यांच्या कामाप्रमाणे व मानाप्रमाणे निश्चित स्वरूपाचे वेतन मिळत असे. या वेतनावर त्यांची गुजराण होई. मध्ययुगीन जनजीवनावर धर्माचा पगडा होता. राजा हा ईश्वरी अंश मानल्यामुळे राज्याचे अधिकारी व पद उपभोक्ते आपोआपच पुण्याईने प्राप्त झालेले आहेत असा समज होता.

मध्ययुगीन कालखंडात अशी राज्य कारभाराच्या दृष्टीने असंख्य पदे निर्माण केली गेलेली आहेत. ती पदे काही श्रेष्ठ दर्जाची तर काही सामान्य दर्जाची अशी होती. प्रत्येक काळात त्यात बदलही झालेले आहेत. विशिष्ट व्यक्तीमुळे कांही पदांना महत्त्व व श्रेष्ठत्व ही प्राप्त झालेले दिसून येतात.

१) जदुनाथ सरकार यांनी MughalAdministration या ग्रंथामध्ये म्हटले की "प्रशासनाची तत्त्वे, पदाची नावे व दर्जा व कार्यपद्धती." इतर पार्शियन पद्धतीची होती. प्रांतीय शासनपद्धती ही अरबी पद्धतीची होती तर स्थानिक प्रशासन हे भारतीय परंपरेतील होते. ही सुलतान शासनव्यवस्था ही भारतीय चौकटीत बसलेली आहे. इराणी व अरबी कार्यपद्धतीची होती.

२) डॉ. बेनि प्रसाद यांनी म्हटले की, "शासनव्यवस्था ही तूर्कांच्या शासन व्यवस्थेपेक्षा जास्त लोकाभिमुख आणि कल्याणकारी होती"

**उद्दिष्ट्ये :**

१) मध्ययुगीन भारतीय इतिहासातील अधिकारी व विविध पदे कोणती होती याचा ऐतिहासिक दृष्टीने अभ्यास करणे.

२) मध्ययुगीन कालखंडातील अधिकारी व पदाधिकारी यांचया कार्यप्रणालीस झालेली परिवर्तने अभ्यासणे.

३) मध्ययुगीन कालखंडात भिन्न भिन्न राजवटींच्या सत्तेमुळे पदाधिकारी व अधिकारी यांनी केलेल्या कार्यांची अंमलबजावणी कितपत होत असे हे पाहणे.

४) मध्ययुगीन पदांचे ऐतिहासिक महत्त्व स्पष्ट करणे.

५) मध्ययुगीन राजांच्या कार्यप्रणाली व प्रशासन व्यवस्था यांचा अभ्यास करणे.

६) मध्ययुगीन पदांच्या वेतन वा मानधनातही सतत परिवर्तने होत आली, पुढे जहागिरी देण्यात आल्या त्यांचाही अभ्यास करणे.

७) मध्ययुयगीन पदांच्या निवडी व नेमणुका राजे स्वत: करित त्याचे वंश परंपरा व गुणवैशिष्ट्ये तपासली जात त्यांचा शोध घेणे.

८) मध्ययुगीन कालखंडातील एकूणच पदनिर्मितीचा आढावा घेणे.

९) मध्ययुगीन कालखंडाच्या पदाची चर्चा घडवून आणणे व समकालीन पदाबाबत तुलनात्मक अध्ययन करणे.

**विषयाची निवड :**

मध्ययुगीन कालखंड हा भारतीय इतिहासातील महत्त्वाचा तर विविधतेने परिपूर्ण असा कालखंड आहे. राज्यसत्ता चालविण्यासाठी निर्माण केलेली पदे सदैव अभ्यासकांना आकर्षित करणारी ठरली. विविध पदांच्या नावातील खासियत, निराळेपण, दर्जा व अधिकार वापरण्याची परवानगी या सर्वांमुळे ही पदे कायमची मनात कारल्या गेली. त्यातूनच प्रस्तुत अभ्यासविषयाचे बीजारोपण मनात झाले.

मध्ययुगीन कालखंडातील पदांचे हे परिवर्तनीय स्वरूप व आजच्या लोकशाहीतील पदांची एक तुलना सातत्याने होत राहते. यातून या विषयाची निवड लेखनासाठी करावीअसे मनोमन वाटले.

**दिल्ली सल्तनत काळातील अधिका-याचे कार्ये :**

सुलतानशाही काळामध्ये भारतात नवीन प्रशासन व्यवस्था सुरू झाली. ती म्हणजे अरबी व फारशी पद्धतीवर आधारित होता. ती पूर्ण इस्लाम धर्मावर आधारित होती. प्रशसनामध्ये उलेमा यांची फार महत्त्वाची भूमिका होती. इ.स. १२०६ ते १५२६ पर्यन्तच्या काळाला सुलतानशाही काळ म्हणतात. पहिला सुलतान कुतुबुद्दीन ऐबक हा होता. तर शेवटचा सुलतान इब्राहिम लोदी होता.

सुलतान काळात, गुलामवंश, खिलजी वंश, तुघलक वंश, सय्यद वंश, व लोदी वंश अशी ५ घराण्याची दिल्लीवर राज्य केले.

"सुलतान काळात प्रधानमंत्र्याला वजीर नावाने ओळखले जात असे. वजिराच्या विभागाला "दिवाण ए वजादात" असे म्हणत असत. प्रान्ताच्या जमा खर्चाचा हिशोब ठेवणा-या अधिकाऱ्यांचा "मुशरिफ मानसिक किंवा महालेखा परीक्षक असे म्हणत असत. तर सेनेच्या मुख्य अधिकाऱ्याला "आरीज ए. उमलिक असे म्हणत असत, आलेख विभागाच्या अध्यक्षाला "दबीर ए. खास म्हणत असत. तसेच कोषाध्यक्षाला 'खजीज' मुख्य न्यायाधीश शाळा काजी ए. मामलिक असे म्हणत असे

१) अमीर - ई - अबूर (अश्वशाळेचा प्रमुख) (२) शाहनाज-ई-पिलान. प्रमुख (गज शाळेच्या)

२) इमारत - ई - आम या गव्हर्नरचे अधिकार मर्यादित होते. सद्रूस सुदूर धर्मादाय खाते सुदूर हा धर्म विभागाचा प्रमुख होता. वरिल प्रमुख मंत्र्याशिवाय दिवान-ए-मस्तखराज (करवसुली खाते) अमीर कोही (कृषी मंत्री) मललिस-ए-खलबत (सल्ललागार मंडळ) अमीर-ए-आखुर (पागा प्रमुख) हाजीब (गृहप्रबंध) शेख उल इस्लाम (मुख्य धर्माधीश) वर्कील ए दार (किल्ल्या) दारोगा इ. महत्त्वाचे सरकारी अधिकारी त्या त्या क्षेत्रासंदर्भात कामे करत आहे.

३) अमीर इ शिकार (सुलतानाच्या शिकार कार्यक्रमाचा व्यवस्थापक प्रांतीय प्रशानात इमारत-ए-खास यांनी लष्कर भरती, वेतन निश्चिती करवसुली अंतर्गत शांता इ. कामे होती. आरिज - ए- मुमालिक सैन्यमंत्री, "दबीर -ए-खास पत्रव्यवहार मंत्री गोपनीय अधिकारी, काझी-ए- मलिक (न्यायमंत्री) न्यायव्यवस्थेची देखरेख त्यांच्याकडे होती. सद्र उस सदूर (दिवाण-इ-काझा) या अधिका-याकडे इस्लामी कायद्याची अंमलबजावणी करणे हे काम होते. दिवाण-ए-रसालत (परराष्ट्र मंत्रालय)"

कानुंगो- उदा: सुबा, सरकार, आणि परगणा होई, प्रांतीयकानुंगो दिवाणाने तयार केलेल्या महसूल मंत्रालयाला, साक्षीदार म्हणून सही करी. कानुगो मुवाझिना, दस्तूर-एल-अमल यासारखे व खेड्यांच्या याद्या तयार करणे महसूल मंत्रालयाला" सादर करी. कानुगो मुवाझिना, दस्तूर-एल, अमल या सारखे व खेड्यांच्या याद्या तयार करणे महसूल मंत्रालयाला" सादरकरी. कानुंगो कामे "तकसीम किंवा मुआझिना दाहसाला, दस्तूर-एल, कानुंगो कामे "तकसीम किंवा मुआझिना दाहसाला, दस्तूर-उल, अमल, किंवा नगरभाव, खेड्यांच्या याद्या, जामादामी आकडे अरामा" जमिनीचे दप्तर तसेच कोणत्या पद्धतीने अनुदान दिले आहे ते नोंदलेले असे.

चौधरी = मुख्य शब्दार्थाने चौधरी म्हणजे चार (भाग आणि नफा) धारण करणारा तसेच खेड्यातला प्रमुख जमीनदार आणि तालुकादारांच्या बरोबर स्थावर संपत्तीधारण करणारा म्हणूनही त्याचा अर्थ होता. चौधरी हा महत्त्वाचा अधिकारी असे स्थानिक जमिन महसूल कारभाराशी त्यांचा संबंध ही असे चौधरी पद वंशपरंपरागत दिसते. परगण्यामध्ये एका वेळी एकापेक्षा अधिक चौधरी असत. लागवडीसाठी आणलेल्या जमिनीचा विस्तार करण्यासाठी चौधरीला सर्व तऱ्हेचे प्रयत्न करावे लागत असत. शिवाय खेड्यातील बेलगाम व बंडखोर लोकांना सरकार जेव्हा कडक शिक्षा करी वदडपून टाकी त्या वेळी सरकारी अधिकाऱ्यांना त्याला सहाय्य करावे लागे. (१८)

दिवाण-इ-अर्ज - दिवाण-इ-अर्ज म्हणजे युद्ध विभाग या विभागाच्या प्रमुखाला अरिस-इ. मुमलिक म्हणत. ज्याची जबाबदारी सैन्याची भरती करणे. त्याचे वेतन ठरवणे. सैन्याला रसद पुरविणे लुटीवर देखरेख करणे. सर-इ-जानदार हा सुलतानाचा अंगरक्षकाचा प्रमुख असे. गुन्हेगार युद्धकैदी यांना शिक्षा देणे इ.

कामे या अधिका-याकडे होती.

राज्यकारभाराच्या सोयीसाठी प्रांताचे विभाजन जिल्हा सरकारमध्ये करण्यात येत असे.

(१) फौजदार किंवा जिल्हा सरकार प्रमुख हा जिल्ह्याचा प्रमुख अधिकारी होता. त्याची नियुक्ती केंद्र कडून करण्यात येत असे. फौजदाराची कामे (१) जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था ठेवणे जिल्ह्यातील प्रजेच्या मालमत्तेचे वजीवितांचे रक्षण करणे (२) शेतसारा व इतर कर वसूल करणा-या अधिका-यांना मदत करणे. (३) फरण्यातील म्हणजे तालुक्यातील अधिका-यांवर नियंत्रण ठेवणे ही कामे फौजदारांची होती. (२) अमलगुजार किंवा जिल्हा दिवाण हा महसूल अधिकारी होता. त्याची कामे. (१) जमीन महसूल गोळा करणे, जमीन महसूल प्रांतीय दिवाणाकडे पाठवणे (२) संकटसमयी शेतक-यांना कर्जमाफी व कर्जे देणे. (३) शेतक-यांची व पिकांची पाहणी करणे दौरे काढणे अहवाल प्रांतीय दिवाणाकडे पाठवणे. (४) जिल्हा खजिनदाराच्या कार्यावर देखरेख ठवणे.

**(३) जिल्हा हिशेब प्रमुख किंवा बितिकची :** हा अधिकारी अमलगुजार या अधिका-यास मदत करणारा होता. त्याची कामे महत्त्वाची होती. (१) निरनिराळ्या फरगण्यातील वसुली संबंधीची हिशोब पत्रके तयार ठेवणे. (२) प्रत्येक कानुनगो (पटवारी) व मुकादम (पाटील) यांच्याकडून येणारी कागदपत्रे तपासणे व छाननी करणे. (३) जिल्हा कोषागरात वजमलेल्या कराचा किंवा उत्पन्नाचा हिशोब ठेवणे.

**(४) जिल्हा खजिनदार :** हा जिल्हा प्रशानातला अति महत्त्वाचा अधिकारी होता. जिल्ह्यातून शेतसारा उत्पन्नाची रक्कम, त्यासंबंधीचे कागदपत्रे स्वीकारणे.

**(५) शिकेदार किंवा तहसीलदार :** हा अधिकारी फरगाणा प्रमुख होता. (१) फरगाण्यात शांतता व सुव्यवस्था ठेवणे

(२) फरगाण्यातील न्यायव्यवस्थेचे काम पाहणे गुन्हेगारांना शिक्षा देणे.

**(६) आमिन :** हा अधिकारी शेतसारा व अन्य उत्पन्न सांभाळणारा अधिकारी होता. त्याची कामे शेतसारा निश्चित करणे. व वसूल करणे. (२) सरकार किंवा जिल्हा विभागातील अमलगुजर या अधिका-याला सहाय्यक म्हणून काम करणे.(१२०)

**सारांश :**

(१) मोगल कालखंडातील अधिकारी व पदाधिकारी यांच्या कार्यप्रणालीत काय काय बदल झाले याचा आढावा घेण्यात आला.

(२) मध्ययुगीन कालखंडात पदाचे ऐतिहासीक महत्त्व स्पष्ट करण्यात आले.

(३) अधिकारी वर्गाचीनिवड व नेमणुका राजे स्वतः करित असत. त्याचे वंशपरंपरागत वत्याची गुण वैशिष्ट्ये तपासली गेली.

(४) मध्ययुगीन कालखंडात एकूणच कोणत्या प्रकारचे पद निर्मितीचा आढावा घेण्यात आला.

(५) राजाची कार्यप्रणाली व प्रशासन व्यवस्था यांचा अभ्यास केला गेला.

**संदर्भ सूची :**


१) मोगल कालीन भारत : प्रा. मा.म. देशमूख

२) मध्ययुगीन भारत : डॉ. सतीष चंद्र

३) मध्ययुगीन भारत : प्रा. मदन मार्डीकर

४) मोगल कालीन भारत : के.टी. बिराजदार

५) मध्ययुगीन भारताचा इतिहास : डॉ. जयसिंह पवार

६) मोगल कालीन महसूल पद्धती :

७) मध्ययुगीन भारताचा इतिहास : प्रा. वसंत देशपांडे

८) मुघल कालीन भारत : डॉ. आर.के. पृथ्वी.


❑❑❑